सत्यप्रभा 17.12.25

कारवाई | सिंदखेड पोलिसांची धडाकेबाज कामगिरी

# चोरीस गेलेले पेरणी यंत्र अवघ्या १२ तासांत जप्त

प्रतिनिधी । **माहूर**

तालुक्यातील वडसा येथील शेतकरी शंकर दत्तात्रय चारोडे यांच्या शेतीकामासाठी वापरल्या जाणाऱ्या ट्रॅक्टर व पेरणी यंत्राची चोरी झाल्याची घटना ताजी असतानाच सिंदखेड पोलिसांनी अवघ्या १२ तासांत या गुन्ह्याचा छडा लावत यवतमाळ येथून संपूर्ण मुद्देमाल जप्त केला. या जलद व अचूक कारवाईमुळे सिंदखेड पोलिसांच्या कार्यक्षमतेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

फिर्यादीत नमूद केल्यानुसार, चारोडे यांच्या मालकीचा सोनालिका 'छत्रपती' कंपनीचा ट्रॅक्टर व पेरणी यंत्र दिनांक १४ रोजी रात्री अज्ञात चोरट्यांनी लंपास केले होते. शेतीच्या कामासाठी अत्यावश्यक असलेले हे यंत्र चोरीस गेल्याने शेतकरी हवालदिल झाला होता.




## तब्बल ७ लाख ९० हजारांचा मुद्देमाल जप्त

यवतमाळ येथून तब्बल ७ लाख ९० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात पोलिसांना यश आले. या प्रकरणी पीयूष दिलीप मुंनगीलवार, रोहित पावडे व शेख सलमान शेख माजीद (तिघेही रा. वडसा, ता. माहूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी आरोपीला पकडून चांगली कामगिरी केली आहे. त्याचे कौतुक होत आहे.

मात्र, पोलिसांसमोर उभे ठाकलेले हे आव्हान सिंदखेड पोलिसांनी अत्यंत कौशल्याने पेलले. जिल्हा पोलीस अधीक्षक अबीनाश कुमार, अपर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील व उपविभागीय पोलीस अधिकारी किरण भोंडवे यांच्या मार्गदर्शनाखाली सिंदखेड पोलीस ठाण्याचे ठाणेदार रमेश जाधवर, तपास अधिकारी डी. जी. चव्हाण, जमादार संजय शेंडे व संदीप वानखेडे यांनी तांत्रिक विश्लेषण व गोपनीय माहितीच्या आधारे तपासाची चक्रे वेगाने फिरवली.

अखेर यवतमाळ येथून तब्बल ७ लाख ९० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात पोलिसांना यश आले. या प्रकरणी पीयूष दिलीप मुंनगीलवार, रोहित पावडे व शेख सलमान शेख माजीद (तिघेही रा. वडसा, ता. माहूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या चोरीप्रकरणातील आरोपींची नावे समोर येताच वडसा गावासह संपूर्ण माहूर परिसरात खळबळ उडाली असून, शेतकऱ्यांनी सिंदखेड पोलिसांच्या तत्परता, कार्यक्षमता व धडाकेबाज कारवाईबद्दल समाधान व्यक्त केले आहे.